# रंग मोहक अमेरिकेचे

**प्रा. सौ. हेमलता सुधाकर जोशी**

२८ जूनची संध्याकाळ! सात वाजले आहेत. देवापुढे दिवा लावला. रामरक्षा आणि स्तुतीमंत्राचे पठण केले अन् फोन खणाणला, ''आई मी मानसी बोलतेय! १३ जुलैच्या मध्यरात्री तुमची फ्लाईट आहे. एअर इंडियाची दोन तिकीटं बुक केली आहेत. आवरायला लागा...!'' लेक ब्लूमिंग्टन येथे 'स्टेट फार्म'मध्ये मोठ्या पदावर गेली ७ वर्षे अमेरिकेत आहे! आवाजात मधुरता! पण त्याला एक निश्चयाची हुकमी झालर! ''अगं अगं पण इतकी घाई कशाला? आम्हाला जरा विचार तर करू दे!'' माझा विशेष समजूतदारपणाचा आर्जवी आवाज! ''विचार बिचार काही नाही. घाई गडबड काही होत नाही. तुम्ही मला इकडे हवे आहात. म्हणजे मला तुमची आठवण येते आहे, मी एकटी आहे. अरुण (तिचे पती) मिलवॉकीमध्ये कॉम्प्युवेअर या नव्या कंपनीत जॉईन झाले आहेत. ब्लूमिंग्टनपासून कारने चार तासाचा प्रवास दर वीकएंडला गेली चार महिने चालू आहे. मला फार लोन्ली वाटतं.

झाले! आमची नेहमीप्रमाणे लगबग सुरू. ही अमेरिकेची तिसरी ट्रीप. तसे आम्ही आता बरेच अनुभवी झालो आहोत. ''मसाले, लोणची, पिठं, भाजण्या काही आणू नको. कपडे आणू नको. तुम्ही फक्त या...'' मानसीच्या सूचना! पहिल्या ट्रीपमध्ये हे सारं आवर्जून नेताना एक भली मोठी अख्खी बॅग गच्च भरली होती. तर जावई अरुण म्हणाला, ''आईनं सगळ 'ग्रोसरी शॉप' पुण्याहून आणलंय. चला आता महिनाभर फूड क्लबमध्ये जायला नको. पण यावेळी मात्र कटाक्षाने हा सर्व मोह टाळला आणि भारतातील इतर ठिकाणी जाताना जशी तयारी शेवटच्या एका दिवसात करते तशी केली! आणि सॅन्डी गाडीने मुंबईकडे रवाना झालो! सुदैवाने पाऊस काहीच नव्हता. थँक गॉड! लेकीकडे जाताना मन उगीचच भरून येतं. मनात विचाराचं वादळ सुरू होतं. तिचा हसरा चेहरा. विमानातून शिकागो विमानतळावर उतरल्यावर एका हातात सुंदर पुष्पगुच्छ घेऊन दुसऱ्या हाताने वेलकम करण्याची लगबग. जावई अरुण दोन हात वर करून हालवताना 'वेलकम् टू यूएस' असं म्हणतो आहे. नाटकातील पुढचे सारे प्रसंग अगदी वेगाने डोळ्यासमोर येऊ लागले. मग मानसीचं गळ्यात पडणं! माझ्या डोळ्यातील आनंदाश्रू पुसणं! डॅडींना मिठी मारणं! ती एक्साइटमेंट. ती लगबग. त्या पार्श्वभूमीवर अरुणचं हसतमुख पण शांत हस्तांदोलन! पायाला एका हाताने स्पर्श करणं हे सारं कसं हवहवसं वाटत असतं. आम्ही प्रत्येक क्षण अगदी स्मृतीत जपून ठेवलेले. त्याचा पुनःप्रत्ययाचा आनंद आता मिळणार.

सामानाचे नेहमीप्रमाणे चेकींग झाले. बॅगा जमा केल्या आणि एअर इंडियाच्या विमानात बसलो. इकॉनॉमी क्लासमध्ये मला जागा खिडकीपाशीच मिळाली होती. ती माझी कायमची आवडती जागा. मग ती एस.टी बस असो, आराम बस, ट्रेन असो नाहीतर विमान असो. आय जस्ट लव्ह इट! खरे तर विमानातून काचेतून फक्त कापसासारखे ढगच दिसणार असतात. पण तरीही एखादी लहान मुलीसारखी मी कायम काचेला नाक लावून बाहेर बघत असते. ओऽ विमान भरले! एस.टी. भरली तशी! एअरहोस्टेसची लगबग-पट्टे बांधा-स्ट्रेट बसा. त्याआधी

कोल्ड्रींक्स दिली. मग नेहमीप्रमाणे विमान रनवेवर धावले आणि त्यानंतर टेक ऑफ! हा क्षण माझा अत्यंत आवडता. मोस्ट थ्रिलिंग पुन्हा पुन्हा हवासा वाटणारा. नाक वर करून विमान तिरके झाले की आता आपण स्वर्गारोहण करणार असेच वाटते. सर्व देवांचे जप वेगाने सुरू होतात. देवा सुरक्षितपणे विमान ने बरंका! असे कितीतरी वेळा म्हणून झाले. म्हणजे पायलटच विमान चालवणार, पण देवा तुझ्या हातातच रिमोट कंट्रोल राहू दे बरं का! असे वारंवार देवाला खडसावून सांगत असते. पण हा सारा डायलॉग मनातल्या मनात बरं का!

एअर इंडियाची विमान-सर्व्हिस खरंच फारच मस्त आहे. दर एका तासाने कोल्ड ड्रिंक्स, हॉट ड्रिंक्स, खाद्यपदार्थांचा मारा. सर्व पदार्थ एकदम टेस्टी. पण एवढे सारे एका सिटींगमध्ये खाणे अशक्य होते. ब्रेकफास्ट, लंच, डिनरला एकदम निरनिराळी व्हरायटी. माझे गुडघे दुखत होते तर एअर होस्टेसने सतत गरम पाण्याने शेकण्याची पिशवी दिली. एक कम्फर्टेबल प्रवास. पहिला हॉल्ट दिल्लीत, दुसरा जर्मनीमध्ये फ्रँकफुर्टला. इथे मात्र सर्व प्रवाशांना बाहेर काढले जाते. एअरपोर्टवर अगदी एस.टी. बस स्टॅण्डसारखी गर्दी. काही माणसं खुर्च्यांवर बसलेली. काही उभी. काहींनी तर जमिनीवरच बसकन् मारलेली. चालायचंच शेवटी आपल्या शरीराचे आणि मनाचे कम्फर्ट महत्त्वाचे. एक तासभर मग परत फ्रेश होणे, कोल्ड्रींक्स पिणे, पासपोर्ट चेकींगसाठी लाईनमध्ये उभे राहणे आणि पुन्हा नीटनेटक्या स्वच्छ चकचकित व्यवस्था केलेल्या विमानात प्रवेश करणे, जागेवर बसणे, बेल्ट बांधणे वगैरे सुरू. आता काय शिकागो एअरपोर्टवर कधी पोहोचतो असे झाले. कृत्रिमरित्या विमानात अंधार केला तरी आपल्याला झोप येईलच ही गॅरंटी नाही. मग वाटते ही खरी रेस्ट असते, एअरहोस्टेस आणि कर्मचाऱ्यांची पण तरी माणसे आपापल्या जागांवर समाधीस्त अवस्थेत दिसतात खरी. यावेळी मात्र मी सरळ पायातले बूट काढून टाकले आणि आमच्या इकॉनॉमी क्लासपासून एक्झिक्युटिव्ह क्लासपर्यंत जाणे-परत येणे अशी शतपावली सुरू केली. चांगल्या २५ फेऱ्या विमानातल्या विमानात मारल्या. तेव्हा कुठे जरा बरे वाटले.

नाऊ वुई हॅव रिच्ड शिकागो. टाईम इज..... वगैरे वगैरे अनाऊन्समेंट सुरू झाल्या. माझ्यासाठी व्हिलचेअरचा इंतजाम झाला होता. त्यामुळे सर्वात शेवटी उतरणारे पॅसेंजर आम्ही दोघे होतो. एका अमेरिकन असिस्टंटने व्हीलचेअर आणली. मी बसले. आम्ही दोघे आता सामान घेण्यासाठी निघालो. परत प्रतीक्षा. शेवटी एकदाच्या बॅगा आल्या. आम्ही दोघे बाहेर आलो. समोर नेहमीप्रमाणे मानसीचा हसतमुख चेहरा. एका हातात गुच्छ, एक हात जोरजोरात हलवित, ''आई, डॅडी वेलकम् टू यू एस.'' शेजारी अरुण जोरजोरात दोन्ही हात हलवताना दिसले. लेक खुर्चीवरच माझ्या गळ्यात पडली. अमेरिकन असिस्टंटने दोघींचा फोटो काढला आणि आम्ही बाहेर आलो. बाहेर मात्र आमच्या दोघांची विभागणी झाली. मी मानसीच्या गाडीत आरामशीर व्हॅनमध्ये. डॅडी अरुणच्या मरुन रंगाच्या लालचुटुक टोयोटामध्ये. गाड्या भरधाव ब्लूमिंग्टनच्या दिशेने निघाल्या.

मानसीने टेप ऑन केला... आरती अंकलीकरांच्या दमदार स्वच्छ सुरेल आवाजातील मल्हार रागातील चीज सुरू झाली आणि मी एकदम भानावर आले. अगं मानसी हे काय गं? चक्क क्लासिकल म्युझिक. होय आई आता सध्या मी आरती अंकलीकरांचे धडे घेते आहे. चक्क फोनवर म्युझिक ट्यूशन आणि ऑफिसमधून घरी आले की रियाज. त्याच्या जोडीला कारमधून येता-जाताना सतत क्लासिकल ऐकणे. त्याशिवाय माझा अभ्यास कसा होणार? माझं हृदय भरून आलं. सात वर्षे अमेरिकेत राहून मॉडर्न म्यूझिकचा गदारोळ करणाऱ्या संगीताच्या

कर्कश समुद्रात आपली लेक वाहून गेली नाही तर.. त्याउलट दर्जेदार क्लासिकल संगीत साधनेचा वारसा एवढ्या प्रामाणिकपणे जपते आहे तर. आई अगं आता ब्लूमिंग्टनमध्ये आम्ही इंडियन म्युझिक सोसायटी स्थापन केली आहे. त्यात सातत्याने क्लासिकल व्होकल आणि इन्स्ट्रूमेंटल म्युझिक प्रोग्राम्स होत असतात. आतापर्यंत अनेक नामवंत कलाकारांचे कार्यक्रम झाले आहेत. आरती अंकलीकर, राहुल देशपांडे, संजीव अभ्यंकर... आणि हो आमचेही प्रोग्राम्स होतात. त्यामध्ये मी क्लासिकलच गाते. शिकागो ते ब्लूमिंग्टनच्या रस्त्यावर सफाईने ड्रायव्हिंग करीत मानसी मला सांगत होती. त्याक्षणी तिच्याविषयीची कौतुकाची भावना लपवणे मला केवळ अशक्य होते. लहानपणी हट्टाने मी तिला गंधर्व महाविद्यालयाच्या परीक्षा द्यायला लावल्या होत्या. तिच्याबरोबर मीपण संगीत शिकायला बसत असे. परीक्षा पण दिल्या, पण मध्ये वेस्टर्न म्युझिकची लाट आली. आता त्या समुद्रात माझी पोरगी बुडतेय की काय असे वाटत होते. पण आता मात्र निराळेच विलोभनीय दृश्य समोर साकार होत होते. मानसीनं चक्क क्लासिकल म्युझिकमध्ये एवढा मोठा आणि खराखुरा इंटरेस्ट घ्यायला सुरुवात केली होती. एका अपूर्व समाधानाने मी चक्क अंतर्बाह्य सुखावले. आनंदाच्या डोहात बुडाले.

त्या शब्दब्रह्माच्या संगीताच्या तालावर आम्ही घरी कधी पोहोचलो ते कळलेच नाही. ...वुई वेअर इन २९ ॲशलिंग कोर्ट. मानसीचे घर नं. २९, परिचयाच्या खुणा दिसल्या. गॅरेजचा ॲटोमॅटिक दरवाजा उघडला आणि दोन्ही गाड्या अतिशय दिमाखात आत प्रवेश करत्या झाल्या. वेलकम् होम्! .... अरुण- मानसी दोघांच्या आवाजाने माझे वर उडालेले विमान परत खाली आले. मस्त वाफाळलेली नेसकॉफी, छानशी बिस्कीट्स ... मग अरुणची लगबग सुरू झाली. एखाद्या लहान मुलासारखा तो मला दाखवायला लागला. नवा सोफा, नवा मोठा सोनी टी.व्ही.चा थिएटर सेट... सोफ्यावर बसल्यावर पायाखाली सपकन रिलॅक्स करणारी अ‍ॅरेंजमेन्ट. मानसीने देवापाशी दिवा लावला. साईचंदन अगरबत्तीचा वास साऱ्या घरात दरवळला. त्या अतिशय सुंदर, नीटनेटक्या देखण्या घरातील वातावरण अधिकच प्रसन्न झालं. आम्ही भक्तीभावाने देवापुढे हात जोडले. देवा या दोघांना असेच तुझे मंगल आशीर्वाद आयुष्यभर लाभू दे, या जोडीला सतत आनंदात ठेव... सुखात ठेव...

मानसी स्टेट फार्म इन्शुरन्स कंपनीमध्ये पटणी कॉम्प्युटर कंपनीतर्फे गेली सात वर्षे ब्लूमिंग्टन येथे प्रोजेक्ट को- ऑर्डिनेटरच्या पदावर फार महत्त्वाचे कार्य करीत आहे. गेल्या ७ वर्षांच्या वास्तव्यात अमेरिकन जीवनाला आवश्यक असणाऱ्या सर्व आधुनिक दर्जाच्या जीवनशैलीची तिला फार जवळून ओळख झालेली आहे. सफाईदार इंग्रजी बोलते. अमेरिकन लोकांचे इंग्रजी पटकन समजणे हा तिच्या उजव्या हाताचा मळ आहे. अमेरिकन लोकांच्या इंग्रजीचे उच्चार आम्हाला पटकन कळायचेच नाहीत. पण तिच्याबरोबर निरनिराळ्या ठिकाणी म्हणजे खुद्द स्टेटफार्मची कंपनी, हेल्थक्लब्ज्, हॉटेल्स, सांस्कृतिक कार्यक्रम, फेस्टिवल्सना सतत जायला मिळाल्यामुळे आमच्या ज्ञानात जरा बऱ्यापैकी भर पडतेय असे वाटायला लागले. निदान तोंड ओळख तरी बऱ्यापैकी झाली.

अमेरिकेत फिरताना मात्र ड्रायव्हिंगची सवय असली पाहिजे. रस्ते फारच प्रशस्त पण विशिष्ट ट्रॅकमधून विशिष्ट स्पीडमध्ये गाडी चालवण्याचे कौशल्य आत्मसात करावे लागते. मानसीचे ड्रायव्हिंग अनुभवण्याची चांगली संधी मिळाली. तिच्याबरोबर ब्लूमिंग्टन शहर, स्टार्व्हरॉक, शिकागो या ठिकाणी खूप प्रवास केला. तिचे सहजसुलभ ड्रायव्हिंगचे कौशल्य पाहून माझे हृदय खरंच आनंदाने भरून येते. आपली छोटी मुलगी आता एवढी मोठी झाली

यावर माझा विश्वास बसत नव्हता. तिच्या ड्रायव्हिंगमध्ये खूप सफाईदारपणा आणि एक प्रकारचा इझ आहे, आत्मविश्वास एकदम जबरदस्त. ड्रायव्हिंग करता करता ती अगदी उत्साहाने त्या त्या भागाची भौगोलिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक माहिती देते. त्याच्या जोडीला सेन्स ऑफ ह्यूमरची फार मोठी देणगी आहे. आणि सर्वांबरोबर म्हणजे गाडी सुरू झाली की पंडित भीमसेन जोशी, आरती अंकलीकर, मालिनी राजूरकर, श्रुती सडोलीकर या नामवंत श्रेष्ठ शास्त्रीय संगीत गाणाऱ्या कलाकारांच्या सी.डी.ची पार्श्वभूमी. गाडी आणि सीडी बरोबरच सुरू होते. ती स्वतः शास्त्रीय संगीत लहानपणापासून शिकलेली असल्यामुळेच या संगीताची तिची जाण फार सखोल स्वरूपाची आहे. तिने स्वतः शास्त्रीय आणि उपसंगीताचे खूप चांगले कार्यक्रम ब्लूमिंग्टनच्या दर्जेदार कार्यक्रमात सादर केलेले आहेत.

शनिवारची प्रसन्न सकाळ. पण मी मात्र अजून जेटलॅगच्या तावडीतून सुटले नव्हते. अवेळी झोप येत होती. पण तशीच उठले. घराच्या मागच्या बाजूला असलेल्या पॅटिओमध्ये झोपाळ्यावर बसून खुर्च्यावर बसून आम्ही सकाळचा चहा नाश्ता केला. मानसीच्या हातचे खास टोस्ट सँडविचेस. माझे आवडते पदार्थ! अमेरिकन फ्रेश हवेचा गंध नाकात सामावून घेतला. झोपाळ्यावर डुलता डुलता माझे डोळे मिटत होते-उघडत होते. मानसी ऑफिसला गेली आणि मग सारं आवरून आमचा फेरफटका अरुणच्या बरोबर सुरू झाला. ब्लूमिंग्टनमधील मोकळ्या रस्त्यावर असंख्य गाड्या सुळकन् बोटीसारख्या धावतात. कुठेही हॉर्नचा कर्कशपणा नाही. गोंधळ नाही. सारं कसं आखीव रेखीव. सुंदर घरे, व्यवस्थित कट केलेली लॉन्स, हिरवीगार वनश्री....सारं काही प्रसन्न डोळ्याला सुखावणारे वातावरण. आमच्या आवडत्या पूरण रेस्टॉरंटमध्ये चक्क इडली सांबार ओरपले.. शनिवारी चार वाजता अरुण त्याच्या गावाला मिलवॉकीला गेला.

संध्याकाळी दीपकराम यांची बासरी आणि अनुव्रतो यांचा तबला वादनाचा सुंदर कार्यक्रम इंडियन म्युझिकल सोसायटीमध्ये ऐकण्याची अपूर्व संधी मिळाली. दीपकराम हरिप्रसाद चौरसिया यांचे शिष्य. त्यांचे वास्तव्य अमेरिकेत गेली तीस वर्षे आहे. एवढ्या पट्टीच्या कलाकाराचे बासरीवादन ऐकताना आम्ही अगदी हरवून गेलो. जवळ जवळ ३ तास अक्षरशः गानसमाधीतच आम्ही सर्वजण रंगून गेलो होतो. कलकत्त्याच्या केवळ एकवीस वर्षाच्या अनुव्रतोची तबल्याची साथ तर एकदम काळजाचा ठाव घेणारी ठरली. तबल्यावरची त्याची पकड, ठेका आणि अत्यंत आत्मविश्वासाने वाजवण्याची स्टाईल अप्रतिम होती. दीपकराम यांची बासरी आणि अनुव्रतोचा तबला यांची जुगलबंदी, सवाल-जवाब अगदी मस्त रंगले. ब्लूमिंग्टनचे भारतीय आणि अमेरिकन श्रोते अगदी रसिक वृत्तीचे आणि चैतन्यशाली आहेत. त्यांनी अगदी भरभरून साथ दिली. कलाकारांचे मनापासून कौतुक केले. आम्हालाही कार्यक्रमानंतर कलाकारांशी मनापासून गप्पा मारण्याची संधी मिळाली. ते दोघेसुद्धा अतिशय मोकळेपणाने आमच्याशी बोलले. अमेरिकेतील हे फार विशेष असते. कलाकारांशी अगदी जवळून, मोकळेपणाने बोलण्याची संधी मिळते. सिलेक्टेड ऑडिअन्स असल्याने वातावरण अगदी प्रसन्न असते.

शेक्सपियरच्या ट्वेल्थ नाईट या नाटकातील एक सुप्रसिद्ध वक्य आहे. ईफ म्युझिक बी द फूड ऑफ लव्ह... प्ले ऑन .... ब्लूमिंग्टन येथे आमची कन्या सौ. मानसी जोशी-सिंग, डॉ. उदय देऊस्कर, मनप्रीत बेदी, श्री. प्रसन्न माटे, श्री. समीर या अत्यंत उत्साही धडपड्या व्यक्तींच्या अविरत प्रयत्नाने 'इंडियन म्युझिक सोसायटी

(फॉर्मरली आय एम सी) ऑफ सेंट्रल आय एल' या संस्थेची स्थापना २००६ मध्ये झाली आहे. या संस्थेचे ध्येय फार उच्च दर्जाचे आहे. भारतीय संस्कृती आणि परंपरेच्या शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीताला प्रोत्साहन देणारे एक आदर्श व्यासपीठ निर्माण करणे. त्यामुळे अनेक नवीन होतकरू संगीत, शास्त्रीय संगीत जाणणाऱ्या शिकणाऱ्या तरुण आणि उत्साही कलाकारांना फार मोठी संधी मिळाली आहे. वर उल्लेख केलेल्या अगदी थोड्या उत्साही कार्यकर्त्यांच्या प्रयत्नाने सुरू झालेल्या या शास्त्रीय संगीताच्या रोपट्याची आता फार छान वाढ झालेली आहे. ब्लूमिंग्टन आणि आजूबाजूच्या गावामध्ये सातत्याने निरनिराळे कार्यक्रम व्हायला लागले आहेत. स्थानिक कलाकारांना संधी मिळते आहे. त्यांच्या कौशल्याचा लाभ या सर्व गावातील उत्साही श्रोत्यांना मिळत आहे. २००६ ते २००७ या काळात इंडियन म्युझिकल सोसायटीतर्फे अमेरिकेच्या बाहेरील श्रेष्ठ दर्जाच्या कलावंतांचे फार सुंदर कार्यक्रम झाले आहेत. संगीतप्रेमी श्रोत्यांना अक्षरशः फार मोठी फीस्ट मिळाली आहे. राहूल देशपांडे यांचे सुश्राव्य गायन फार बहारीचे झाले. उस्ताद शाहीद परवेझ यांचा सतारवादनाचा कार्यक्रम अतिशय रंगतदार झाला. संजीव अभ्यंकर यांची शास्त्रीय गायनाची मैफल अप्रतिम झाली. सौ. आरती अंकलीकरांच्या शास्त्रीय गायनाने संगीतप्रेमी श्रोत्यांच्या हृदयाचा ठाव घेतला होता.

याच पार्श्वभूमीवर आम्हाला श्रीमती श्रुती सडोलीकरांच्या शास्त्रीय गायनाचा फार अलभ्य लाभ झाला. डॉ. उदय देऊस्कर गेली ३० वर्षे अमेरिकेत वास्तव्य करून आहेत. व्यवसायाने डॉक्टर असले तरी शास्त्रीय संगीत आणि उपशास्त्रीय संगीत हा डॉक्टरांचा अत्यंत आवडीचा भाग आहे. त्यामुळे त्यांच्या घरात अशा अनेक नामवंत कलाकारांच्या शास्त्रीय गायनाचे कार्यक्रम होत असतात. श्रुती सडोलीकरांचा कार्यक्रमही डॉक्टरांच्या घरी झाला. भारतातील नामवंत गायिका असलेल्या श्रुतीताईंनी अस्सल भारतीय शास्त्रीय संगीतातील विविध राग अत्यंत कौशल्याने सादर केले. त्यांचा आवाज एकदम खडा मोकळा स्वच्छ आहे. त्यांचे गायन चालू असताना श्रोते फारच रंगले होते. रागाची सुरुवात करण्याअगोदर त्यांनी विशिष्ट रागाची माहिती, त्याची विशेषता उत्तम इंग्रजीमध्ये फारच सुरेख पद्धतीने सांगितल्यामुळे आम्हाला एक आदर्श वस्तुपाठच मिळाला. त्यांची मैफिल सर्वार्थाने रंगली.

* * *

## स्टार्व्हड् रॉक स्टेट पार्क

रविवारी या ठिकाणाला भेट दिली. इलिनॉय स्टेटमध्ये 'स्टार्व्हड् रॉक स्टेट पार्क' हे अत्यंत लक्षणीय आणि प्रेक्षणीय ठिकाण आहे. इलिनॉय नदीच्या दक्षिणेला आणि लासेल पेरू व ओटावा या शहरांच्या मध्ये हे सुंदर ठिकाण वसलेले आहे. ४२५ लक्ष वर्षांपूर्वी सेंट पीटर सॅण्डस्टोनपासून नैसर्गिकरित्या तयार झालेले आश्चर्यकारक खडकांचे विविध आकार एका प्रचंड पोकळ इनलँड सी मध्ये वहात आले. ते नंतर समुद्राच्या पृष्ठभागावर आणले गेले. हे दगडांचे आकार अतिशय आश्चर्यकारक आणि विलक्षण स्वरूपाचे आहेत. 'स्टार्व्हड् पार्क' यासाठी अतिशय प्रसिद्ध आहे. इलिनॉय नदीचा सभोवतालचा परिसर हा घनदाट अरण्याने व्यापलेला आहे. 'स्टार्व्हड्

रॉक'मधील इलिनॉय दरी म्हणजे नैसर्गिक सौंदयाचा मुक्त उधळलेला खजिनाच आहे. अनेक वेळा पूर आले. त्यात वहात आलेल्या ग्लेसियर्सचे रूपांतर अनेक खळाळणाऱ्या धबधब्यांमध्ये झाले आहे. हे धबधबे प्रचंड आवाज करीत खडकांवर कोसळत असतात आणि दगडांची झीज करीत असतात. त्यांचे दर्शन नेत्रांना सुखविणारे असले तरी त्यांचा प्रचंड आवाज आणि रौद्रस्वरूप एक प्रकारची धडकी भरवतो.

हिरव्यागार वनश्रीचे सौंदर्य कोसळणाऱ्या धबधब्यांचे रौद्रस्वरूप पाहण्यासाठी या ठिकाणी टूरिस्ट्स अनेक देशां धून सतत येत असतात. मार्च ते सप्टेंबर हे महिने हवामानाच्या दृष्टीने फार प्रसन्न असल्यामुळे निसर्गाचा वरदहस्त लाभलेल्या या ठिकाणाचा लोक मनमुराद आनंद लुटत असतात. स्प्रिंग आणि समर सीझनमध्ये रंगीबेरंगी फुलांनी हा सर्व भाग बहरून जातो. स्वच्छ शुद्ध हवेच्या झुळका मनाला प्रसन्न करीत असतात. शाळा कॉलेजच्या ट्रीप्स येत असतात. सारे वातावरण तरुण लोकांच्या उत्साहाने अधिकच उत्साही होते. घनदाट जंगलात भटकंती करण्याचा अनुभव अतिशय रोमांचकारी असतो. याठिकाणी स्टार्व्हड् रॉक लॉजेस आणि कॉन्फरन्स सेंटर आहे. तिथे अनेक कार्यक्रम सातत्याने चालू असतात. या लॉजमध्ये ७२ आरामशीर खोल्या आणि २२ केबिनरुम्स उपलब्ध आहेत. शौकिन लोक बऱ्याच वेळा येथे वीकएन्डला राहणे पसंत करतात. कॅम्पिंगसाठी सुद्धा आरक्षित जागा असतात. धोकादायक उड्डाणे, पाण्यावर तरंगणे, आकाशात ग्लायडरच्या साहाय्याने उड्डाणे करणे, त्यामधून किंवा बलूनमध्ये उंच जाऊन स्टार्व्हड् रॉक-पार्कचे सौंदर्य पाहणे हा त्यांचा अतिशय आवडता उद्योग. तसे चित्तथरारक अनुभव घेण्यासाठी भरपूर साधने उपलब्ध असतात. ती लुटण्यासाठी तुमच्या खिशात मात्र भरपूर पैसा हवा. स्टार्व्हड् रॉक पार्क मध्ये पिकनिक, फिशिंग, बोटिंग करणे, घोड्यावरून रपेट मारणे यासारख्या करमणुकीच्या गोष्टींची भरपूर रेलचेल आहे. प्रत्येक सिझनला योग्य असे खेळ आहेत. कडक्याच्या थंडीत, बर्फ पडल्यानंतर विंटर स्पोर्ट्स सुरू होतात. त्यामध्ये स्केटिंग, स्केईंग सारखे विविध प्रकारचे खेळ उपलब्ध असतात. अंगावर भरपूर गरम कपडे घालून हे खेळ खेळणारे असंख्य महाभाग अतिशय उत्साहाने त्यांचा आनंद लुटताना दिसतात. त्यामुळे या ठिकाणाला पुन्हा पुन्हा भेट द्यावीशी वाटते. खरंच फार सुंदर ठिकाण पाहायला मिळाले आम्हाला!

या पार्कमध्ये १८ कॅनियन्स  आहेत. या दऱ्यांमधून साहसी वाटचाल करणे, दुर्बिणीतून खोलवर पसरलेल्या हिरव्यागार वृक्षराजी पाहणे, फोटो काढणे अशा अनेक गोष्टींमध्ये पर्यटक मनसोक्त आनंद लुटतात. या दऱ्यांच्या दगडी भिंती खडकांच्या बनलेल्या आहेत. त्यांचे नैसर्गिक आकार विविध स्वरूपांचे असतात. कधी ते मोठमोठ्या कपारींसारखे दिसतात तर कधी कधी दगडांचे स्लाईस ब्रेडचे स्लाईस एकमेकांवर ठेवल्यावर कसे दिसतील तसे दिसतात. आगळेवेगळे रानटी सौंदर्य पाहताना डोळ्यांचे पारणे फिटते.

या ठिकाणाला 'स्टार्व्हड् रॉक' हे नाव कसे पडले, असा प्रश्न सतत माझ्या मनात येत होता. व्हिजिटर सेंटरमध्ये त्याविषयीचे भरपूर साहित्य उपलब्ध झाले. हा इतिहास खरोखरीच फार मनोरंजक आहे.

अत्यंत रानटी स्वरूपाच्या घनदाट जंगलांनी भरलेल्या या भागात ८००० ख्रिस्तपूर्वकालापासून मानवी वस्तीच्या खुणा आढळतात. होपवेलियन, वूडलॅन्ड आणि मिसिसिपी एतद्देशीय अमेरिकन संस्कृती येथे नांदत होती. इ.स. १५०० ते १७०० पासून 'इलिनिवेक' या अमेरिकन जमातीचे रहिवाशी येथे फार मोठ्या संख्येने

नांदत होते. त्याचबरोबर ५००० ते ७००० कॅसकियस आदिवासी जमातीचे लोक इलिनॉय नदीच्या काठापासून ते सध्याच्या स्टॉर्व्हड् रॉक पार्कपर्यंत वस्ती करून होते.

इ.स. १६७३ मध्ये फ्रेंच एक्सप्लोरर, शोधक प्रवासी ल्युईस जोलियेट आणि फादर जेक्विस मार्क्विट मिसिसिपीहून टूलिनॉयला जाताना याच ठिकाणाहून पुढे गेले. दोन वर्षांनी पुन्हा फादर मार्क्विट जेव्हा येथे परत आला तेव्हा त्याला कास्कास्किआ इंडियन व्हिलेज कासकिया इंडियन खेड्यामध्ये इलिनॉय येथील पहिल्या श्रेष्ठ दर्जाच्या ख्रिश्चन मिशनची स्थापना झाल्याचे आढळून आले.

जेव्हा फ्रेंचांनी या प्रदेशावर नव्हे तर संपूर्ण मिसिसिपी व्हॅलीवर आपला हक्क प्रस्थापित केला तेव्हा १६८२–८३ या काळात त्यांनी फोर्ट सेंट ल्युईस ॲटप स्टार्व्हड् रॉक हा किल्ला बांधला. कारण या जागेची रचना युद्धातील स्ट्रॅटेजीच्या दृष्टीने अतिशय सोयीची होती.

स्टार्व्हड् रॉक स्टेट पार्क या नावाचा संबंध अन्याय आणि हाल सहन कराव्या लागणाऱ्या एका अमेरिकन दंतकथेशी आहे. इ.स. १७६० मध्ये ओटावा आदिवासी जमातीचा प्रमुख नेता पोनटियक हा दक्षिण इलिनॉयमध्ये आदिवासी सभेत हजर राहण्यासाठी आला असताना इलिनॉविकडून मारला गेला. त्याच्या वधाचा सूड घेण्यासाठी दोन टोळ्यांमध्ये युद्ध झाले. त्यावेळी पोटावा टोळी या ओटावाच्या मित्र समूहाने इलिनॉविक टोळ्यांवर हल्ला केला. इलिनॉविक टोळीने १२५ फूट उंचावर असलेल्या खडकावर आश्रय घेतला. त्यामुळे ओटावा आणि पोटावाटोमी यांनी त्या उंच खडकाळ प्रदेशाला घेराव घातला आणि इलिनॉविक टोळीची रसद तोडली. याचा परिणाम म्हणजे इलिनॉविक टोळीतील लोक असाहाय्य झाले आणि भुकेने तडफडून मरण पावले. त्यामुळे या उंच खडकाळ प्रदेशाला 'स्टार्व्हड् रॉक' हे नाव पडले.

* * *

## मिलवॉकी

आमचे जावई अरुण सिंग अतिशय उत्साही आणि अत्यंत धडाडीचे तरुण! मनमिळावू स्वभाव पण मिश्किलपणात कोणालाही हार जाणार नाहीत! अत्यंत व्यासंगी माणूस. वाचनाची प्रचंड आवड. नेतृत्वाचे सर्व गुण. उत्तम ड्रायव्हिंग. वीकएण्डला उत्साहाने प्लॅनिंग करून एखाद्या सुंदर ठिकाणाला भेट कशी द्यायची, कोणत्या हॉटेलमध्ये राहायचे, उत्तम खाद्यपदार्थाचे कसे सिलेक्शन करायचे हे त्यांच्याजवळूनच शिकावे. त्यांच्याबरोबर गाडीतून प्रवास करणे हा खरंच फार आनंदाचा अनुभव असतो.

शनिवार रविवार अरुणच्या फ्लॅटवर मस्त आनंदात घालवले. अरुणच्या मार्गदर्शनाखाली मिलवॉकीमधील सुप्रसिद्ध आर्ट म्युझियम पहाण्याचा अनुभव खरोखरी ग्रेटच होता. 'आर्ट–लिव्हज हियर' असे वर्णन हा म्युझियम पाहिल्यावर करावेसे वाटले. या म्युझियममध्ये पाऊल टाकताच सर्व वयाच्या व्यक्तींना जगातील सुप्रसिद्ध

चित्रकारांच्या चित्रांची फोटोंची दालने पाहाता येतात. त्यामध्ये मॉनेट, पिकासो, वॉरहॉल O'keette यांच्या चित्रांचे अगदी जवळून निरीक्षण करता आले. मॉडर्न आर्टची भव्य पेंटिग्ज वाहून मन अगदी हरवून गेले. या आर्टम्युझियममध्ये जर तुम्ही सभासद झाला तर अनेक फिल्म्स्, व्याख्याने, गॅलरी टॉक्स, टूर्स यांचा सुद्धा आनंद केव्हाही मनमुराद लुटता येतो.

लहान मुलांना आवडणारी शिबिरे, कृतिसत्रे सुद्धा सतत येथे चालू असतात. हे म्युझियम पाहाताना असे मुलांचे आणि होतकरू चित्रकारांचे खूप समूह पाहिले. काही तरुण चित्रकार तर सुप्रसिद्ध कलाकृतीसमोर बसून अगदी तन्मयतेने कॅनव्हासवर ती चित्र काढीत होते, रंगवित होते. सोळा वर्षाच्या वरील तरुणांसाठी आणि सिनियर मंडळींसाठी 'पेंटिग विथ पिसारो'सारख्या वर्गात पिसारोच्या भव्य लॅण्डस्केप आणि पॅलेटवरून स्फूर्ती घेतलेली आहे. त्यामध्ये ऑईल, पेस्टल, वॉटर कलर आणि ॲक्रॅलिक तंत्राचा वापर कसा करावा हे शिकविले जाते. हे विद्यार्थी त्यांची स्वतःची लॅण्डस्केप्स तयार करतात आणि त्या चित्रांचीही प्रदर्शने भरविली जातात. आर्ट ॲप्रिसिएशन क्लासेस मध्ये या चित्रांचे ॲप्रिसिएशन कसे करावे याची कलात्मक दृष्टी मिळते. "Look closely, imagine freely enjoy immensely, share happily and return repeatedly." 'लुक क्लोज्ली, इमॅजिन फीली, एन्जॉय इंमेन्सली, शेअर हॅपीली ॲण्ड रिटर्न रिपिटेडली' असा संदेश हे म्युझियम पहाताना ठिकठिकाणी मोठमोठ्या भव्य बोर्डवर ठळकपणे दिलेला होता. त्याचा खरोखरीच प्रत्यक्ष अनुभव आम्ही घेतला. इजिप्शियन ममी, कॉफीन ऑफ पेडिइसर, सीए ३५० बीसी पाहिली. त्यामध्ये निळ्या रंगाचा वापर जास्त दिसला. नार्दो-द-गोन, मॅडोना ॲण्ड चाईल्ड, सीए १३५० हे चित्र पाहाताना लहान बाळाला कडेवर घेतलेल्या व्हर्जिन मेरीचा रोब निळ्या रंगाचा दाखवला आहे. मातृत्वाचे लोभस दर्शन हे चित्र पाहाताना झाले. तसेच इटालियन म्युरोनो, नेट इवर लेट सिक्स्टीज सेंच्युरीमधील उथळ पण निळसर रंगाचे बाऊल फारच मनोवेधक होते. हे बाऊल निळ्या रंगाच्या काचेचे बनविण्यात आलेले आहे. क्लॉड मोनेट, वॉटरलू ब्रीज, सनलाईट इफेक्ट, सीए १९०० या चित्रांचा इ.स. १७०० पूर्वी केवळ अपघाताने शोध लागला. त्यामध्ये पर्शियन ब्लू रंगाच्या छटांचा फार सुंदर उपयोग केलेला आहे. या कलाकृतींच्या चित्रांचे फोटो नमुने अगदी न विसरता घेतले.

कोणत्याही मुझियममध्ये राजेरजवाड्यांच्या विलासी जीवनाची आणि सौंदर्यपूर्ण दृष्टीची झलक दाखविणारे दागदागिने, वस्त्रप्रावरणे, गालिचे, सोन्यारुप्याने मढवलेले आरसे, भांडीकुंडी, फर्निचर यांची अगदी आकर्षक मांडणी असते. पण या म्युझियममध्ये मात्र एक विलक्षण दालन पहायला मिळाले. 'गोईंग आऊट ऑफ स्टाईल' असे नाव असलेल्या या आर्टगॅलरीमध्ये चक्क आऊट ऑफ डेट झालेल्या फर्निचरचे अतिशय सुंदर नमुने पाहिले. गेल्या चारशे वर्षात फर्निचरच्या टेस्टमध्ये कसेकसे बदल होत गेले हे पाहाताना आजच्या युगात ही फर्निचर्स 'आऊटडेटेड ॲण्ड डिटेस्टेबल' कशी आहेत याची लेबल्स त्या खुर्च्यांना, सोफासेट, मोठमोठ्या कपाटावर लावलेली दिसली. त्या फर्निचर्सची वर्णने अशा शब्दात केलेली पाहून मला धक्काच बसला. कारण माझ्या दृष्टीने ते सर्व फर्निचर जुन्या स्टाईलचे असल्यामुळे फार एलिगंट (elegant) आणि आर्टिस्टिक (कलात्मक) होते. हे दालन पाहाताना एक वेगळीच दृष्टी मिळाली.

✻ ✻ ✻

## मिलर ब्रेविंग बीअर कंपनीला भेट (व्हिजीट टू–मिलर ब्रेविंग को. सिन्स १८५५)

‘‘आता आपण मिलवाकीमधील अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणी जाणार आहोत. कशासाठी माहित आहे. भरपूर बिअर पिण्यासाठी आणि पाहाण्यासाठी. मनाची तयारी करा.’’ ‘शीऽऽ बिअर पिण्यासाठी का जायचे? त्यात काय एवढे विशेष’ मी म्हटले. तेवढ्यात अरुणने गाडी सफाईदारपणे मिलर ब्रेवलिंग को. सिन्स १८५५, मिलवॉकी, डब्ल्युआयएस, युएसए असा मोठा बोर्ड असलेल्या प्रचंड मोठ्या इमारतीसमोर उभी केली. आम्ही खाली उतरलो. समोर तिरूपती बालाजीच्या समोर देवळात प्रवेश करण्यासाठी जशी रांग लागते तशी टूरिस्टची रांग लागलेली होती. काऊंटरवर तुमच्या नावाची नोंद करायची, हाताला पट्टा बांधायचा, मग १५ ते २० जणांच्या ग्रुपने प्रथम ऑडिटोरियममध्ये प्रवेश करायचा आणि फिल्म बघायची.

१८५५ सालापासून म्हणजे जवळजवळ गेली १५० वर्षे मिलर ब्रेविंग कंपनी आमदर्जाच्या बिअरचे उत्पादन करीत आहे. हे उत्पादन अगदी प्राथमिक अवस्थेपासून ते प्रगत अवस्थेपर्यंत कसे होते, याचे दर्शन या फिल्ममध्ये घडते. शेतात उगवणाऱ्या बार्ली धान्यापासून ते प्रत्यक्ष बियरमध्ये त्याचे रूपांतर करण्याच्या सर्व प्रक्रिया पाहून मी अगदी थक्क झाले. आजही मिलर कंपनीच्या बियरचा दर्जा सर्व जगात प्रथम क्रमांकाचा मानला जातो. यानंतर कंपनीचे मार्गदर्शक या ग्रूपला घेऊन सर्व यंत्रणा व्यवस्थित दाखवतात. ठिकठिकाणी योग्य ते स्पष्टीकरण करतात. ते स्पष्टीकरण म्हणजे बियरचा चालताबोलता इतिहासच असतो. त्यात जोक्स, कॉमेंट्स, प्रवाशांच्या प्रश्नांना मिश्किलपणे उत्तर देणे या सर्वांचा एक दिलखुलास अनुभव मिळतो. टूर टू सेंटर ब्रेवरी शॉप झाल्यावर प्रत्यक्ष जिथे बिअर तयार होते तेथील मोठमोठ्या कन्टेनर्सचे दर्शन खरोखरीच अपूर्व असते. त्याचवेळी प्रवाशांना कंपनीतर्फे मनसोक्त बिअर पिण्यासाठी दिला जातो! हा खरा एक्साईटमेंटचा क्षण असतो. आमच्या बरोबरच्या प्रवाशांमध्ये तरुण, म्हातारे, मध्यमवयीन सर्व स्त्री–पुरुष होते. अक्षरशः प्रत्येक जण चार–पाच, पाचपाच बीअरचे ग्लास सहजपणे सरबतासारखे पोटात रिचवत होते. हे दृश्य मात्र अगदी वेगळेच होते! एखाद्या पेयाचा त्यातही फुकट मिळालेल्या बीअरचा आनंद घेणारा माणूस हा सगळीकडे कसा सारखाच असतो याचा प्रत्यय आला! पण मोठ्या कन्टेनरमधील ती गोल्डन कलरची बीअर पाहून खरंच खूप गंमत वाटत होती. अनेक लोकांनी बीअरच्या आकर्षक बाटल्यांची खरेदी केली. मिलर कंपनीची जाहिरात करणाऱ्या सर्वांत मोठ्या बिअरच्या बाटल्यांना प्रेमाने विळखा घालून, वेगवेगळ्या पोजेसमधील फोटोग्राफ पण काढण्यात सर्वजण मशगूल झाले होते! मिलवॉकीमधील या इतिहासप्रसिद्ध ठिकाणाला भेट देऊन आम्ही गाडीत बसलो. आता वेध लागले होते काहीतरी टेस्टी, चवदार खाद्यपदार्थांचे!

* या ‘ब्रेवरी टूर्स’ चे पत्रक मोठे मजेशीर होते. ‘फॅक्ट्स’ या सदरात खालील गोष्टींचा समावेश त्यात अपेक्षित होता. ती जाहिरात फारच इंटरेस्टिंग वाटली–

– इट्स फन फॉर ऑल.

– फोर ब्लॉक इनडोअर आऊटडोअर वॉकींग टूर

– प्लीज ड्रेस फॉर द वेदर

- मंडे- सॅटरडे

- लक अबाऊट वन आवर

- रिझर्वेशन फॉर ग्रूप्स ऑफ १५ ऑर मोअर

- ब्रिंग यूवर लव्ह फॉर बियर ॲण्ड ॲन आयडी!!

## नूडल्स कंपनी

दररोज भात भाजी पोळी या मेनूचा अगदी कंटाळा आला होता. करण्याचा आणि खाण्याचा पण अमेरिकेत आल्यावर खाण्यात इंटरेस्ट असणाऱ्या माणसाची कधीही उपासमार होत नाही-शाकाहारी मांसाहारी पदार्थांची अगदी रेलचेल असते निरनिराळ्या हॉटेल्समध्ये. तुमची आर्थिक पोझिशन मात्र एकदम साऊंड पाहिजे. आम्ही पडलो शाकाहारी, पण शाकाहारी आणि माणसालासुद्धा भरपूर समाधान मिळेल असा नेमका मेनू सिलेक्ट करण्याचे कौशल्य आणि निश्चित माहिती पाहिजे बरं का? नाहीतर तुम्हाला नुसत्या ब्रेडबटरवर रहावे लागते.

मिलवॉकीमधल्या सुप्रसिद्ध नूडल्स कंपनी या हॉटेलमध्ये प्रवेश करताच समोरच्या आकर्षक नूडल्सच्या टेस्टी पदार्थांचे आकर्षक फोटो पाहून तोंडाला अगदी पाणी सुटले... 'एक्स्प्लोर द वर्ल्ड ऑफ नूडल्स' या घोष वाक्याने आमचे स्वागत झाले. समुद्राच्या पृष्ठभागावरील जहाजातून जगात पर्यटन करता येते तसे नूडल्सच्या खाद्यपदार्थांच्या जगातील पर्यटनाला आम्ही सुरुवात केली. प्रथम लक्ष वेधले ते समोरच्या ठळक सूचनेकडे, “Everyday we sauté dishes inspired by the great flavors of Asia the Mediterranear and America’s heart land.” 'एव्हरीडे वुई साऊट डिशेस इन्स्पायर्ड बाय द ग्रेट फ्लेवर्स ऑफ एशिया द मेडिटरऽनिअर ॲण्ड अमेरिका हर्टलँड!' मऊ मऊ कुशन्स असलेल्या खुर्च्यांवर बसलो. हसऱ्या चेहऱ्याच्या असेरिकन वेटर्सने गुडमॉर्निंग म्हणून स्वागत केले. हाय म्हणून प्रत्येकाकडे पाहून आकर्षक स्माईल दिले. मला वाटले की आम्ही खरंच खास पाहुणे आहोत! स्पेशल व्हिजिटर्स आहोत! पण नंतर चौफेर नजर टाकताच लक्षात आले की आत येणाऱ्या सर्वच गिऱ्हाईकांचे असे स्वागत होते! तो अमेरिकी उपचाराचा एक सर्वसाधारण यांत्रिक भाग आहे! असो!

मेनू कार्ड्स समोर आली. काय नव्हते त्यात! नूडल्सच्या असंख्य व्हरायटीज! अेशियन, मेडिटरेनियन, अमेरिकन... जॅपनीज पॅन नूडल्स, पड थाली, बँकॉक करी, इंडोनेशियन पीनट सूट! थाई करी सूप, चायनीज चॉप, सॅलॅड, पेनेरोसा, पास्टा फेस्का, होल ग्रेन टस्कन फेटूचिनी, टोमॅटो बेसिल बिस्क, द मेड सॅलॅड, बटरनूडल्स,... माय गॉड! ही नावे एखाद्या अवघड मंत्राच्या उच्चारापेक्षा फार अवघड वाटली. मनात आलं की खरंच हे पदार्थ अस्तित्त्वात असतात का! तोंडाला पाणी सुटलं होतं पण जीभ मात्र या नावाचा उच्चार करतांना अडखळायला लागली होती. मी खरंच बावरून गेले! नेमके काय खायचं? मला काहीच निर्णय घेता येईना! एवढा अवघड समर प्रसंग खाण्याच्या बाबतीत मी कधीच अनुभवला नव्हता!

आमची कन्या मानसी आणि जावई अरुण मिश्किलपणे माझ्याकडे पाहून गालातल्या गालात हसत होते! ''आई चॉईस तुला करायचा आहे! यू आर गोईंग टू एक्सप्लोर द वर्ल्ड ऑफ नूडल्स!'' प्रथम मी शांतपणे थंडगार पाण्याचा एक घुटका घेतला आणि माझ्या यजमानांकडे नजर टाकली. ते एखाद्या लायब्ररीत बसलेल्या स्कॉलर्ससारखे पुस्तक वाचावे तसे मेनूकार्ड शांतपणे मनातल्या मनात वाचत होते! आय नीडेड हेल्प. पण अशा वेळी ते एकदम फिलॉसॉफर् बनतात. मग मात्र माझा मीच निर्णय घेतला आणि एखाद्या एक्सपर्ट खवय्याच्या रूबाबात धडाधड ऑर्डर दिली... पड थायी, बँकॉंक करी, थायी करी सूप ॲन्ड पेस्टो कावाटापी... वेट्रेसने गोड स्मितहास्य केले आणि दहा मिनिटात सारे खाद्यपदार्थ समोर हजर झाले! वॉव... आकर्षक मांडणी, गरमागरम आणि टेस्टी डिशेस पाहून मन प्रसन्न झाले! 'पड थायी' हा पदार्थ म्हणजे कोबी, गाजराचे तुकडे आणि स्वीट चिलीचे तुकडे आणि स्क्रॅम्बल्ड एगमध्ये फ्राय केलेल्या थायी गुडल्स! हा प्रकार फारच कलरफुल होता. बँकॉंक करी, ब्रोकोली, गाजर, लाल मिरे, कांदा आणि मश्रूम्स घालून बनवलेला नूडल्सचा भात होता. तर थाई करी सूप म्हणजे एकदम लज्जतदार सूप होते... पालक, कोबी, मश्रूम्स, टोमॅटो, लाल कांदे आणि नूडल्स यांचा वापर करून नारळाची पिवळ्या रंगाची कढी म्हणजे हे थाई करी सूप... विचार न करता एखादा बाण मारावा आणि तो आपोआप लक्ष्यावर जाऊन पडावा तसे खाद्यपदार्थांचे शरसंधान मी केले आणि त्यात यशस्वीपण झाले... सगळ्यांनी अगदी कोणत्याही कॉमेंट्स न करता सारे पदार्थ संपविले...

दुपारी मस्त झोप काढली आणि ४ वाजता पुन्हा आमचे साईट सीन सुरू झाले. मिलवॉकीमध्ये चक्क तिरुपती स्टाईलचे भव्य बालाजी मंदिर आहे. त्याच मंदिरात सर्व हिंदु धर्माच्या देवदेवतांचे म्हणजे, गणपती, भगवान शंकर पार्वती, प्रभु रामचंद्र-सीता, हनुमान, महालक्ष्मी, नवग्रह यांचेही दर्शन होते! मंदिर अतिशय भव्य, पांढऱ्याशुभ्र मार्बलमध्ये बनविलेले.... शांत, प्रसन्न वातावरण.... दणादण घंटा वाजत नव्हत्या... सर्व भक्त शांतपणे दर्शन घेत होते. मनातल्या मनात प्रार्थना करीत होते... कुठेही आरडाओरडा, गडबड नाही.... कसलाही अव्यवस्थितपणा नाही. सारं कसं नीटनेटके... जवळच एक जैन मंदिर पण आहे... त्या मंदिरात ध्यान करण्यासाठी भव्य हॉल. हॉलमध्ये गेल्यावर तेथील प्रकाशयोजना, सुबक मखमली मऊ कार्पेट्स यांचा मनावर एक वेगळाच परिणाम होतो. खरंच मनापासून ध्यान करावेसे वाटते. आपण आपोआप ध्यानाच्या अवस्थेत जातो इतके सुंदर वातावरण होते. ५० वर्षांपूर्वी महर्षी महेश योगी यांनी भावातीत ध्यान- ट्रान्ससेन्डेन्टल मेडीटेशन प्रोग्रामची ओळख आणि सुरुवात जगातील तीन हजार मोठमोठ्या शहरांमध्ये केली. हे सर्व कार्यक्रम पीस प्लेसेस ॲन्ड एनलाईटेनमेंट सेंटर्समध्ये होतात. आज जागृतीची उच्च अवस्था प्राप्त करण्याची ध्यानाची असंख्य सत्रे या सर्व केंद्रामध्ये चालविली जातात. लक्षावधी लोक त्याचा फायदा घेत आहेत. मिलवॉकीमध्ये पण असे भव्य महर्षी एनलाइटमेंट सेंटर आहे. "Transendental Mediatation opens the awareness to the infinite reservoir of energy, creativity and intelligence that lies deep within everyone" 'ट्रान्सेनडेन्टल मेडिटेशन ओपन्स द अवेअरनेस टू द इनफआयनाईट रिझरवॉयर ऑफ एनर्जी, क्रिएटीविटी ॲन्ड इन्टेलिजन्स दॅट लाईस डीप विदिन एव्हरीवन' हे महर्षी महेश योगींचे उद्‌गार ठळक अक्षरात लावलेला बोर्ड पाहिला! प्रत्येक व्यक्तीला आपली उन्नती करण्याचे सर्व मनोरथ पूर्ण करण्याचे ध्येय साधण्याचा अधिकार आहे. तसेच प्रत्येक राज्यात समस्या नसलेले वातावरण, सर्व देशात, सर्व विश्वकुटुंबात शांततापूर्ण, सुसंवादी वातावरण निर्माण करता येण्याची गरज आणि

शक्यता आहे. ध्यानाच्या माध्यमातून समतोल व्यक्तिमत्त्वाची, उच्च आकांक्षा आणि ध्येय गाठण्याची क्षमता असणारी जास्तीत जास्त कर्तबगार माणसे हे करू शकतील. असा फार मोठा विश्वास महर्षींनी लोकांच्या मनात निर्माण केला. हे भव्य सेंटर पाहताना माझे मत महर्षींविषयी आदराने भरून आले!

असे हे इंद्रधनुषी रंग अमेरिकेचे! हे सुंदर अनुभव माझ्या स्मृतीत अगदी देखण्या शिल्पासारखे कोरले गेलेले आहेत! सुप्रसिद्ध इंग्रज कवी विल्यम वर्डस्वर्थ डॅफोडिल्स या सुंदर कवितेतील अनुभवासारखीच माझी अवस्था झाली! सुवर्णमयी रंगाच्या प्रसन्नपणे डुलणाऱ्या, हलणाऱ्या चैतन्याने सळसळणाऱ्या लक्षावधी फुलांची आठवण म्हणजे जीवनातील एकांतात दिलासा देणारे, चैतन्य देणारे आठवणींचे वरदानच ठरले!

For oft upon my coach I lie,
They flash upon my inward eye
which is the Bliss of Solitude!!

* * *

**प्रा. सौ. हेमलता सुधाकर जोशी**
फ्लॅट नं.१०, राजमयुर सोसायटी (२), ए-३, एरंडवणे,
कर्वे रोड, पर्सिस्टंट सॉफ्टवेअरच्या मागे, पुणे-४११००४.
फोन नं.- ०२०-२५४४०५७६.